



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार ९ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# ईडीपासून सुटका म्हणजे पुनर्जन्म, भुजबळांवरुन स्फोटक दावा; पुस्तकावर कारवाईचा इशारा



## छगन भुजबळ काय म्हणाले?

या पुस्तकात करण्यात आलेल्या दाव्यानुसार, छगन भुजबळ यांनी मुलाखतीत सांगितले होते की, “मी ओबीसी असल्याने केंद्रीय यंत्रणा माझ्या मागे लागल्या होत्या. मी जर उच्च जातीचा असतो तर मला असे वागवले नसते. दोन-अडीच वर्षे तुरुंगात काढल्यावर जामिनावर असताना मला ईडीची पुन्हा नोटीस आली. वयाच्या पंचाहत्तरीत किती वेळा चौकशांना सामोरे जायचे, असा प्रश्न होता. आधी १०० कोटींच्या आरोपांवरून राष्ट्रवादीचे आणखी एक नेते अनिल देशमुख यांना ईडीने अटक केली होती. तुरुंगात असताना भाजपमध्ये सहभागी व्हा तरच सुटका होईल, असे अनिल देशमुखांना सांगण्यात आले होते.

**मुंबई प्रतिनिधी**

पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी पुस्तक लिहिलं आहे. ज्यात ईडीपासून सुटका करण्यासाठी भाजप सोबत गेल्याचं भुजबळ म्हणाले असा दावा करण्यात आलाय. ईडीपासून सुटका म्हणजे पुनर्जन्म झाल्याची भुजबळांची प्रतिक्रिया होती असं छापण्यात आलंय तर भुजबळांनी हे दावे फेटाळले आहेत. ईडीच्या कारवाईपासून वाचण्यासाठी अजित पवारांसोबत नेते भाजपसोबत गेले आणि ईडीपासून सुटका म्हणजे पुनर्जन्म आहे, असं भुजबळ म्हणाल्याचा दावा ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी पुस्तकातून केलाय. अर्थात हा, दावा भूजबळांनी फेटाळलाय आणि सरदेसाईंवर आणि त्यांच्या पुस्तकावर कायदेशीर कारवाईचा इशाराही दिला. ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाईंनी त्यांच्या पुस्तकात लिहिलंय की, मे 2023 मधील ती संध्याकाळ होती. नाशिकच्या हॉटेलमध्ये वातानुकूलीत खोलीतही छगन भूजबळांना घाम फुटला होता. व्हिस्कीचे एक एक घूट घेतानाही त्यांच्या चेहरा चिंताग्रस्त वाटला. भुजबळ म्हणाले की, जेलमधील त्या दिवसांचा विचार करुन मला रात्री झोप येत नाही. मी आता 75 वर्षांचा आहे आणि अजूनही ईडी माझ्या मागे लागली आहे. राजदीप सरदेसाईंनी विचारलं की, पण तुम्ही एवढे ज्येष्ठ नेते आहात. मला खात्री आहे की शरद पवार तुम्हाला मदत करतील.भुजबळ म्हणाले की, जेव्हा तुम्ही संकटात असता तेव्हा आयुष्यात एकटे असता. मतलबी है सारी दुनिया. ईडीवरुन भुजबळ बोलले की,वो मुझे देशमुख की तरह फसाना चाहते है. भाजपसोबत हातमिळवणी केल्याशिवाय सुटका नाही, ही सर्वांची भावना झाली. माझ्यासाठी ईडीपासून सुटका म्हणजे एक प्रकारे पुनर्जन्मच. ईडीपासून सुटका झाल्यानं अजित पवार यांच्याबरोबर गेलेल्या सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास सोडला मी ओबीसी असल्याने केंद्रीय यंत्रणा माझ्या मागे लागल्या होत्या. मी जर उच्च जातीचा असतो तर माझ्यासोबत असे वागले नसते.

## पुस्तकातील सर्व दावे नाकारले

भुजबळ यांनी ‘द इलेक्शन दॅट सरप्राइज्ड इंडिया’ पुस्तकातील सर्व दावे नाकारले. ते म्हणाले, मला तुरुंगात जाण्याची भीती आहे, असा आरोप जो केला जात आहे, तो मी नाकारत आहे. मी विकासासाठी एकत्र आलो. आमच्याबरोबर ५४ लोक आहेत. त्यांच्यावर प्रत्येकावर ईडीची केस नव्हती. माझ्या मतदार संघात दोन हजार कोटींची कामे सुरु आहे. सरकारमध्ये आम्ही सहभागी झालो, त्याचा विकासासाठी फायदा झाला आहे.

# शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव दारु मुक्ती गाव हा अजेंडा घेऊन संभाजी ब्रिगेड मैदानात



माजलगाव, प्रतिनिधी : संभाजी ब्रिगेड चे अधिकृत उमेदवार विजय दराडे यांनी दिनांक 07 रोजी सायंकाळी 6 वाजता श्री क्षेत्र पुरूषोत्तम भगवान यांच्या चरणी नारळ फोडून तसेच राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज ,छत्रपती संभाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून प्रचार शुभारंभ केला. मागील 12 वर्षा पासून विजय दराडे यांनी अनेक छोटे मोठे प्रश्न सर्व सामान्य नागरिक यांचे कामे केलेली आहेत. विजय दराडे यांच मताधिक्य कुणाचं कंबर मोढनार अशी चर्चा मतदार संघात चालू आहे. मराठा आरक्षण,ओबीसी आरक्षण, शैक्षणिक प्रश्न,राशन प्रश्न,पीक विमा, शेतकरी योजना , ग्रामीण कामकाज,दवाखाना अडचणी अश्या अनेक समस्या हजारो मतदार विजय दराडे यांच्या पाठीशी उभा असल्याचे दिसून येत आहे. संभाजी ब्रिगेड पूर्ण ताकतीने निवडणूक प्रचार करत असून मोठ मताधिक्य ब्रिगेड चे उमेदवार घेतील असे संकेत दिसत आहेत

# अशोक डक यांचा रमेश आडसकर यांना जाहीर पाठिंबा

## जो माणूस आपल्या वडिलां समोर मी दारू पितो अस म्हणतो तो या मतदारसंघा लायक आहे का ?





माजलगाव। प्रतिनिधी सद्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असून या पार्श्वभूमीवर काल सभापती अशोक आबा डक यांनी एक जंगी कार्यक्रम घेऊन अपक्ष उमेदवार याना जाहीर पाठिंबा जाहीर केला या वेळी मा आ राधाकृष्ण होके पाटील ,फजळू भाई ,एन टी सोळंके ,सतीश होके ,मनोहर डाके ,बाळू जाधव आदींची उपस्थिती होती या वेळी मा आ राधाकृष्ण अण्णा म्हणाले की , शरद पवार साहेबानी ज्यांना ज्यांना प्रवेश दिला त्या सर्व इच्छुक उमेदवाराणा डावलून दुसऱ्याच उमेदवार दिला ही किमया खा बजरंग सोनवणे यांनी केला लोकसभा निवडणुकीत कुठलाही सहभाग नसणाऱ्या मोहनराव याना उमेदवारी दिली हे चुकीचे आहे जो माणूस आपल्या वडिलां समोर मी दारू पितो अस म्हणतो तो या मतदारसंघा लायक आहे का ? असा सवाल उपस्थित केला अशोक अंबानी मैत्री कशी असावी हे या कार्यक्रमातुन दाखवून दिले. काल दि ७ रोजी मुंबई कृषी बाजार समितीचे सभापती अशोक आबा डक यांच्या घरी येथील अपक्ष उमेदवार रमेशराव आडसकर यांना जाहीर समर्थन करत आपला व आपल्या कार्यकर्ते चा जाहीर पाठिंबा दिला असून आम्ही दोघही बालपनांचे मित्र आहोत आता आम्ही ठरवलं आहे आडसकर हे सर्वसामान्याच्या हातात मनगट बसणारा माणूस आहे हाथ दाखवा आणि आपले काम करून घ्या असे हे व्यक्ती मत्व आहे आता कमला लागा रुसवे फुगवे बाजुला ठेवून एक दिलाने आडसकर याना आपण निवडणूक द्यायचे आहे

# तुमच्या विश्वासाला साथ देण्यासाठी मी पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात-अपक्ष उमेदवार रमेश आडसकर



माजलगाव- प्रतिनिधी मागील निवडणुकीत एक लाख मतदारांनी माझ्यावर विश्वास टाकला, थोड्याशा फरकाने माझा पराभव झाला. परंतुमी मैदान सोडले नाही. मतदारसंघातील नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होत आलो. त्यामुळे यावेळी तुमच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी मी पुन्हा निवडणूक लढवत आहे. आणि हशी खेळीच्या वातावरणात मी आमदारकी मिळवणार आहे असा विश्वास अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांनी व्यक्त केला. आपल्या कार्यालयावर आयोजित पत्रकार परिषदेत ते बुधवार दि.६ रोजी बोलत होते. यावेळी त्यांनी मतदारसंघाच्या विकासाचा जाहीरनामा प्रकाशित केला. यावेळी त्यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, माजलगाव मतदार संघातील जनतेने माझ्यावर खूप प्रेम केले आहे. मागच्या विधानसभा निवडणूक वेली प्रचारास मला पुरेसा वेळ मिळाला नाही. परंतु तरीही येतील मतदाहानी एक लाख मतदान मला केले. नवखा असूनही माझ्यावर विश्वास टाकला. त्या विश्वासास पात्र राहण्याचा मी गेल्या पाच वर्षापासून प्रयत्न करीत आहे. घरदार सोडून या ठिकाणी आहे. त्यामुळे माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, माजी आ. मोहनराव सोळंके यांच्यासह ९० टक्के भाजपचा कार्यकर्ता, त्याचप्रमाणे इतर संघटना पक्षाची कार्यकर्ते माझ्यासोगत आहेत. या सर्वांचं निवडणुकीत मला पाठबळ आहे असेही ते म्हणाले. दरम्यान शेतक-यांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरत आहे. नागरिकांच्या सुखदुःखात सामील होत आहे. कोणावर टीका न करता मी अपक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरलो आहे. शहरातील रस्ते, नाट्यगृहे, भूमिगत गटारे, वाजारासाठी जागा, मोफत आरोग्य सेवा, त्याचप्रमाणे स्मार्ट शहर करण्याचा माझा प्रयत्न राहील. असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिली. ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा, २४ तास लाईट, आरोग्य शिक्षण, शेती, इत्यादी जाहीरनाम्यातील प्रश्न सोडवणार असल्याचा विश्वास त्यांनी यादरम्यान बोलून दाखवला. या पत्रकार परिषदेला युवा नेते तन्मय होके पाटील सुरेश दळवे अनंत शेंडगे जयपाल भिसे मतदार संघातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



## निवडकीपुरता जाहिरनामा...!

-निवडणूक मग ती ग्रामपंचायतीची असो वा विधानसभेची. एकदा तारखेची घोषणा झाली कि समस्त प्रमुख पक्ष तयारीला लागतात इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्टींचे निवडणूका म्हणजे लोकशाहीच महोत्सव. काहीजण याकडे युद्ध म्हणूनही पाहतात. प्रेमात आणि युद्धात साम, दाम, दंड, भेद सर्वकाही माफ असते त्याप्रमाणे निवडणुकांमध्ये या सर्व बाबींचा समस्त पक्षांकडून कमी अधिक प्रमाणात वापर केलाच जातो. अनेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून तयार असताना कोणालाही न दुखावता त्यापैकी एकालाच पक्षाचे तिकीट देऊन इतरांना कसे सांभाळायचे यामध्ये पक्षश्रेष्टींच्या अनुभवाचा कस लागतो. एखादा नेता आपल्या पक्षाशी किंवा स्थानिक जनतेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहे हे खरेतर निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावरच कळते. एरव्ही शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम करण्याच्या बतावण्या करणारी नेतेमंडळी पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून एका रात्रीत पक्ष बदलायला मागेपुढे पाहत नाहीत. एखादा नेता परिसरात जगन नावाजलेला असला कि त्याला गळाला लावण्यासाठी अन्य पक्षही फासे टाकून बसलेलेच असतात. यंदा ही रस्सीखेच पाहायला मिळाली. निवडणुकांच्या तोंडावर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी समस्त पक्षांकडून त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. ज्यामध्ये आश्वासनांचा पाऊस पाडलेला असतो. या आश्वासनांमध्ये विकासासोबत महागाई नियंत्रण, जातीय आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, तरुणांना रोजगार, महिला सबलीकरण यांसारख्या अनेकविध बाबींचा प्रामुख्याने समावेश केलेला असतो. पक्षांच्याजाहीर सभांतूनही आम्हीच कसा राज्याचा विकास घडवू शकतो, आम्हीच कसे जनतेचे तारणहार आहोत याच्या बतावण्या केल्या जातात. निवडणुका पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या पक्षाला या आश्वासनांचा सोयीस्कर विसर पडतो. मधले काही दिवस विरोधकांची उणीधुणी काढली जातात. निवडणूका जवळ आल्या कि जे!पुन्हा विकास कामांना सुरुवात होते. वर्षानुवर्षे भारतात हेच सुरु आहे. नेत्यांच्या आश्वासनांना सामान्य जनता बळी पडते. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी परिस्थितीत फारसा बदल होत नाही. निवडणूक आयोगाने गेल्या काही वर्षांत निवडणुकीनिमित्त केल्या जाणाऱ्या खर्चावर आणि पद्धतींवर बंधने आणल्यामुळे तसेच पूर्वीच्या तुलनेत आचारसंहिता अधिक कडक केल्याने निवडणूक प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी शिस्त आली आहे'; मात्र आश्वासने देण्यावर कोणतेही बंधन नसल्याने पक्षांचे फावते. वास्तविक निवडणुकांच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवरसुद्धा बंधने असायला हवीत. राजकीय पक्ष देत असलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असणार, किती कालावधीत आश्वासनांपैकी किती बाबींची जनतेला खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे, एखाद्या समाजाला आरक्षण देण्याची आश्वासने तुम्ही देत आहात तर त्या समाजाला आरक्षणाची खरंच आवश्यकता आहे का ? याविषयीचा सविस्तर लेखा जोखा प्रमुख पक्षांनी प्रशासनाकडे निवडणुकीपूर्वी प्रतिज्ञा पत्रासह सादर करणे बंधनकारक करावे. या आश्वासनांच्या पूर्तीवर नियंत्रण ठेवणारे आणि त्यांना वेळोवेळी जाणीव करून देणारे स्वतंत्र मंडळ असावे. आश्वासनांची वेळेत पूर्ती न करणाऱ्यांना दंडित करण्याचे सुद्धा प्रावधान असावे. असे काही केल्याशिवाय व्याणेकर त्यांची पूर्तता करणार, जनतेला त्यांच्या बहुमोल मताचा मोबदलामिळणार नाही.

# विषमुक्त शेती काळाची गरज, सुदृढ आरोग्यासाठी सेंद्रिय शेतीचा पर्याय

शेतीला भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा मानला जातो. पूर्वी शेतीला प्रथम स्थान, व्यापाराला दुय्यम तर नोकरीला तृतीय दर्जा दिला जायचा. परंतु आताच्या घडीला नोकरी प्रथम स्थानावर, व्यापार दुय्यम तर शेती तृतीय स्थानावर आहे. याला जबाबदार काय तर शेतीवर आधारित विस्कळीत अर्थव्यवस्था. यात शेती क्षेत्रातहि बाजी मारणारे शेतकरी आहेत पण त्यांची संख्या अगदी बोटावर मोजण्याएवढी. बाकी अल्पभूधारक शेतकऱ्यांना कायम तोटाच सहन करावा लागत आहे. बदलते हवामान, अवेळी पाऊस, आणि त्यात असलेली शासनाची धोरणे शेतकऱ्यांना उजरुच देत नाही. शेतीचा वाढत जाणारा खर्च आजकाल परवडेनासा झालाय आणि खर्च करूनही म्हणावे तसे उत्पादन मिळत नाही. रसायनांच्या अति वापरामुळे जमिनी खराब होत चालल्या आहेत. देशात शेतीमध्ये रसायने वापरण्यात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो.म्हणून ठोस पावले उचलत शाश्वततेकडे वळणे प्राधान्य क्रम ठरते. नेमकी शाश्वतता म्हणजे काय, सस्टेनेबल हा शब्द अगदीच प्रचलित झाला आहे. जागतिक पातळीवर सस्तेनेबिलीटी बद्दल कायमच बोललं जात. मग आपल्याकडे कधी येणार हि सस्टेनेबिलीटी हे जाणून घेण आणि त्या प्रमाणे कार्य करणे महत्वाचे आहे. सस्तेनेबिलीटी या शब्दाचा शब्दशः अर्थ होतो टिकाऊपणा. निरंतर चालणारी, पर्यावरणाला हानी न पोहोचवणारी, पुढच्या पिढीसाठी संसाधने जतन करून ठेवणारी शेती म्हणजे सस्तेनेबिलीटी. (फक्त शेती क्षेत्रापुरता विचार केला आहे) सस्तेनेबिलीटी कडे वळताना माती वाचवण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पर्याय अवलंबावा. सेंद्रिय शेतीचे अनेक फायदे आहेत परंतु सेंद्रिय शेतीमध्ये उत्पादन कमीच येते हि धारणा शेतकऱ्यांच्या मनात घर करून बसली आहे. याला कारणही आहे, ज्याने त्याने आपापल्या पद्धतीने समजून घेतली आणि तशीच पुढे शेतकऱ्यांना सांगितली. यात खूप विभिन्नता पाहायला मिळते कोणी म्हणते सेंद्रिय म्हणजे काहीच वापरू नका, कोणी म्हणते फक्त शेण गोमुत्र वापरा, कोणी म्हणते ताक दही वापरा, तर कोणी म्हणते ओम नाम म्हणत धन प्रभारित उर्जा झाडांपर्यंत पोहोचावा. खर तर हे शेतीचे वेगवेगळे प्रकार आहेत त्यामध्ये गोंधळून जाऊन त्यालाच सेंद्रिय म्हटले आहे. त्यामुळे सेंद्रिय शेतीचे शास्त्रीय ज्ञान घेणे खूप महत्वाचे वाटते. सेंद्रिय शेती करताना त्यासाठी सुरुवात कशी करावी, रासायनिक शेतीतून सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरीत होण्यासाठी किती कालावधी लागतो, एकरी खर्च किती येतो, रसायनाला पर्याय म्हणुन कोणत्या सेंद्रिय निविष्ठा आहेत, शेतावरच शास्त्रीय पद्धतीने निविष्ठा कशा बनवाव्या, सेंद्रिय औषधे विकत घेताना खात्री कशी करावी, सेंद्रिय शेतमाल विक्री कोठे करावी, सेंद्रिय शेतीच प्रमाणीकरण कसं करावं या प्रत्येक प्रश्नाला चाचपुनच सेंद्रिय मध्ये उतराव आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करावे. सेंद्रिय शेती म्हणजे कोणत्याही रसायनाचा वापर न करता, शेतावर असलेल्या उपलब्ध संसाधनांचा वापर करून, पर्यावरणाला हानी न पोहोचवता, पुढील पिढीसाठी पर्यावरण जतन करून ठेवत मातीला जिवंत करण्याची शेती आहे. सेंद्रिय शेती करण्यासाठी थोडे कष्ट जास्त आहेत परंतु रासायनिक शेती पेक्षा खर्च कमी आहे. पहिल्या वर्षी उत्पादन कमी येण्याचा संभव असू शकतो परंतु जसजशी मातीला सवय होईल, मातीमध्ये उपयुक्त सूक्ष्म जीवाणूंची संख्या वाढेल तसं नक्कीच उत्पादनामध्ये वाढ होते. बऱ्याच वेळा शेतकरी म्हणतात कि सेंद्रिय शेतमालाला भाव मिळत नाही मग आपण पारंपारिक पद्धतीने रसायनांचा वापर करून जी शेती करतो त्यामध्ये तरी शाश्वतता आहे का असाही प्रश्न पडायला हवा. सेंद्रिय उत्पादने तयार करून किमान माती, पर्यावरण तरी वाचवता येईल हा विचार महत्वाचा वाटतो. सेंद्रिय शेतीमध्ये दोन पैसे अधिक मिळावेत म्हणुन प्रामाणिकपणे प्रयत्न करणे

**पल्लवी चिंचवडे – सेंद्रिय शेती अभ्यासक**

गरजेचे आहे. कोविड १९ नंतर अनेक ग्राहक आरोग्याबाबत सतर्क झाले आहेत. वाढीव किंमत सेंद्रिय शेतमालाला द्यायला तयारही आहेत परंतु शेतमालाची खात्री देणे अत्यंत महत्वाचे आहे. एकदा का ग्राहकाला चव आवडली कि बाजारभावाचा विचार न करता शेतमाल घेण्यास तयार होतात. त्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न महत्वाचे आहेत. सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण करून घेणे आणि स्वतःचा ब्रांड विकसित करण्यावर भर देणे महत्वाचे आहे. सेंद्रिय शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना सरकारकडून प्रोस्ताहन दिले जात आहे. महाराष्ट्रात सेंद्रिय शेतीला प्रोस्ताहन देण्यासाठी परंपरागत कृषी विकास योजना राबवली जात आहे. हि अतिशय स्तुत्य योजना आहे. शेतकऱ्यांनी याचा आवर्जून फायदा घ्यावा. परंतु सेंद्रिय शेतमाल तयार झाल्या नंतर तो विकत घेण्याचे कोणतेही धोरण सरकारचे नाही. शाश्वत सेंद्रिय बाजारव्यवस्थेबाबत उदासीनता पाहायला मिळत आहे. सेंद्रिय शेतमाल हमीभाव केंद्र देशात कुठेच पाहायला मिळत नाही. रासायनिक खत औषधांना जश्या सबसिडी आहेत तशा सेंद्रिय खतांना मिळत नाही. रासायनीक खत औषधे उत्पादित करणाऱ्या कंपन्यांना सरकारने उत्पादनाचे लिमिट ठरवून दिले तरच रसायनांचा वापर काही प्रमाणात कमी होईल आणि शेतकरी आपसूकच सेंद्रिय शेतीकडे वळतील. रासायनिक शेतीतील प्रत्येक घटकाला सेंद्रिय शेतीमध्ये काय पर्याय देता येईल यावर संशोधन होणे गरजेचे आहे. सेंद्रिय निविष्ठा उत्पादित करण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे वाटते. सेंद्रिय शेती सोबतच पुनरुज्जीवीत शेती हेच शेती क्षेत्रामध्ये सस्टेनेबिलीटीकडे घेऊन जाण्याचे मार्ग दिसत आहेत. आपापल्या परीने प्रत्येकाने सेंद्रिय शेतीचे उत्पादन, प्रचार, प्रसार केला तर आणि तरच हि शाश्वतता गाठता येईल. मातीची, माणसाची आणि प्राण्यांची भूक भागविण्यासाठी सेंद्रिय शेती काळाची गरज ठरत आहेत त्यावर ठोस पावले उचलली जाणे अतिशय महत्वाचे आहे.

# राज्यस्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनजयने मिळवले कास्यपदक

बीड- पुणे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत बीडच्या सेंट अँन्स स्कूलचा धनंजय अत्तरकरने कास्यपदक पटकावले. राज्यस्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धा बालेवाडी क्रीडा संकुल पुणे येथे पार पडली या स्पर्धेत महाराष्ट्रातून आठ विभागांच्या खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता 17 वर्षा खालील गटात धनंजय अत्तरकर याने कांस्यपदक पटकावून सेंट अँन्स स्कूलचे नाव उंचावले. या यशाबद्दल सेंट अँन्स स्कूलचे प्राचार्या सिस्टर रोजमीन, समन्वय सिस्टर सुहीला, उपप्राचार्य सिस्टर शायनी आणि सिस्टर सुनीला. क्रीडा प्रशिक्षक शेख अनिस, शेख अफरोज व राहुल जम्पलवार आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याकडे सकारात्मक कामाची दृष्टी आहे- डॉ.दिपाताई क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)**

दि.८ : बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठकांचा धडाका लावला आहे. त्यांना प्रत्येक प्रभाग व वार्डावार्डातून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारादरम्यान त्यांनी काझी नगर, बाळराजे नगर, झमझम कॉलनी आदी परिसरात बैठका घेतल्या. डॉ.योगेश यांच्याकडे सकारात्मक कामाची दृष्टी आहे. त्यांनी कधीही गुंडगिरी किंवा गुंड प्रवृत्तीला थारा दिला नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या, डॉ.योगेश हे उच्च विद्याविभूषित व्यक्तीमत्व असून त्यांच्याकडे विकासात्मक कामाची दृष्टी आहे. आजवर त्यांनी बीड विधानसभेच्या कार्यक्षेत्रात अनेक कामे केली. त्यामध्ये मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन, युवकांसाठी बेरोजगार मेळावे, वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन, गणेशोत्सव, शिवजयंती, दसरा-दांडिया महोत्सवाचे आयोजन यांसारख्या सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ग्रामीण आणि शहरी भागात विकास कसा होईल याकडेच लक्ष दिले. विकास हीच जात आणि विकास हाच धर्म या स्व.काकुंच्या शिकवणीनुसार



डॉ.योगेश यांची वाटचाल सुरू आहे. आजवर अध्यक्षसाहेबांनी बीडच्या विकासासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून काम केले. आता त्यांच्या कार्याची धुरा योगेश यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. बीड विधानसभेच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्याला डॉ.योगेश यांना विधानभवनात पाठवायचे आहे, असेही त्या म्हणाल्या. त्या महायुतीच्या योजनांविषयी सांगितले. लाडकी बहीण, मुलींना मोफत शिक्षण, महिलांना मोफत गॅस सिलिंडर, मोफत प्रवास, शेतकऱ्यांना कर्जमाफी अशा सर्वांगिण विकासासाठी महायुती कटिबद्ध आहे म्हणून या निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकांना माजी नगरसेवक गणेश वाघमारे, शर्मा भाभी, काझी मुहम्मद साकीब, सोहेल, सय्यद झाकी, सादेक सिद्दिकी, हिना शेख, सय्यद फातेमा, झहिरा फातेमा, आशा वर्कर्स ग्रुप, धुतेकर, राजू, पुजारी आर्दीसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.योगेश क्षीरसागर जनतेचे सेवक म्हणून काम करतील डॉ.सारिकाताई क्षीरसागर


बीड (प्रतिनिधी)
दि.८ : बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेचे सेवक म्हणून पुढील ५ वर्ष काम करतील, असे प्रतिपादन डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ त्यांच्यासह पत्नी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात झंजावाती प्रचार दौरा सुरू केला आहे. शुक्रवारी (दि.८) डॉ.सरिकाताई क्षीरसागर यांनी पाली व चौसाळा जिल्हा परिषद गटातील विविध गावात जाऊन संवाद साधला.डॉ.योगेश क्षीरसागर यांनी नाळवंडी जिल्हा परिषद गटातील अंतरवन पिंपरीसह तांडा, खांडे पारगाव फाटा, नागपूर बुद्रुक, नागापूर खुर्द, उमरी, उमरद खालसा, म्हाळसजवळा, मासापूर, पिंपळगाव, ईट, गंगनाथवाडी, बाभूळवाडी, बेलवाडी या गावांच्या एकत्रित चार बैठका घेतल्या. तसेच, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पाली व चौसाळा जिल्हा परिषद गटातील समनापूर, कोल्हारवाडी, आहेरवडगाव, कर्जनी, कपिलधारवाडी, मांडवजाळी, धनगरवाडी, करचुंडी, कोळवाडी, साखरे बोरगाव, गोगलवाडी, खडकीघाट, तांदळवाडी घाट, हिंगणी खू., चांदेगाव, पालसिंगण, चांदणी, चौसाळा, वाढवणा, मानेवाडी, रुईघवन, माळेवाडी, चौसाळा, घारगाव देवी, बाबुळगाव, हिंगणी बु, सुलतानपूर, गोलंगरी लोणी घाट, वडवाडी यासह इतर गावांची एकत्रित बैठक घेऊन ग्रामस्थांची संवाद साधला. या दौऱ्यात ठिकठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वागत केले.



# केज विधानसभा मतदारसंघांमध्ये तिरंगी लढत लक्षवेधी ठरत आहे.

केज / (प्रतिनिधी) :- केज या विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रामुख्याने तिरंगी लढत होत असून, वाचाळ वीराचा किताब, प्राप्त उमेदवाराला मतदार संधी साधून जागा दाखवतील अशी मतदारांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.केज व तालुक्यातून लोकसभेच्या उमेदवाराला १४ हजारापेक्षा जास्त मतांची आघाडी मिळाल्याने, या भागातील मतदारांचा नेमका कौल काय आहे, हे अनुभवलेले आहे. सभ्यता आणि संस्कृती बासनात गुंडाळलेल्या वाचाळीवरांची या भागामध्ये कमतरता नाही.अशा केज विधानसभा मतदारसंघांमध्ये तिरंगी लढत लक्षवेधी ठरत आहे. शिवसेना बाळासाहेब ठाकरे शिंदे गटाचे बलाढ्य उमेदवार नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, सासरे नंदुशेट मुंदडा आपल्या कार्यकर्त्यांच्या ताफ्यासह पायाला घुंगरु लाऊन प्रचारात अग्रेसर झाल्याचे दिसते आहे. या मतदार संघातील उमेदवारांची संख्या पाहता मतांची विभागणी होणार असल्याचे दिसते आहे. सभेच्या रिंगणात शिवसेना शिंदे गटाच्या नमिता



मुंदडा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पृथ्वीराज साठे, व मनसेचे सुरेश गालफाडे हे तीनही उमेदवार तुल्यबळ असल्याने कुणालाही हुरळून जाण्यासाठी संधी नाही. जमिनीवर पाय ठेऊनच प्रचार यंत्रणा राबवावी लागणार आहे आचारसंहितेचे पालन करत वाचाळ भाषा न वापरता जनसामान्यांशी हितगुज करून मतांचा टक्का पदरात पाडून घेणे ही यांची कसोटी आहे. ह्या तीन तुल्यबळ उमेदवारासोबत आणखी बरेच अपक्ष उमेदवार ह्या निवडणूकीच्या रिंगणात आहेत त्यामुळे कुणाच्या टक्यात वाढ होईल अनब कुणाला फटका बसेल हे मतदाराच्या वरतीच राहणार असल्याने ही विधानसभेची निवडणूक रंगतदार आणि चुरसीची होणार अशी परस्थिती आहे

# दिवसभर प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांची जबरदस्त सोय

आष्टी । प्रतिनिधी विधानसभा निवडणुकीत आता रंग भरायला सुरुवात झाली आहे. आतापासूनच कार्यकर्ते आपला उमेदवार किती विकासाच्या कामात सक्षम आहे हे जनतेला पटवून सांगत आहेत. नाष्टा सेंटर, हॉटेल, ढाबे, खानावळीत तर खास चर्चा रंगत आहेत. सायंकाळ नंतर हॉटेल, ढाब्या वरती मोठी गर्दी दिसून येतं आहे. आतापर्यंत ग्राहक न फिरणाऱ्या ढाब्याला सुगीचे दिवस आले आहेत. पक्षाने उमेदवारी जाहीर केल्यापासूनचं काही उमेदवारांनी प्रचार सुरू केला होता त्याला आता वेग आला आहे. निवडणूक कोणतीही असो ती कार्यकर्त्यांच्या जोरावरच लढवावी लागते. एकनिष्ठ कार्यकर्ते असल्यावर निवडणूक सोपी जाते. शिवाय जिंकण्यासाठी प्रामाणिक कार्यकर्ते निष्ठेने पार पाडतात. उमेदवार या कार्यकर्त्यांसाठी गाडी, प्रचार करून दमल्यानंतर आरामाची सोय, जेवणावेळी इतरही व्यवस्था केली जात आहे. जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात निवडणूकीची प्रक्रिया सुरू असून, सर्वच प्रमुख पक्षाचे उमेदवार आपले उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे निवडणूकित उमेदवारी सस्पेन्स संपल्यानंतर प्रचारावर जोर दिला जात आहे. अडगळीत पडलेले कार्यकर्ते आता पक्ष आणि उमेदवारांना महत्वाचे वाटू लागले आहेत. अनेक कार्यकर्ते उमेदवारांच्या बैठकीला दिसतं आहेत. प्रचारासाठी कार्यकर्त्यांची गरज असल्याने उमेदवारही निमूटपणे त्यांचे लाड पुरवत आहेत.

# महाविकास आघाडीच्या सहाही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा - राष्ट्रीय काँग्रेस बीड



## उद्योग पळविणाऱ्या, महागाई-बेरोजगारी वाढविणाऱ्या, जातीय विष पेरणाऱ्या महायुतीला हद्दपार करा

बीड (प्रतिनिधी) - महाविकास आघाडीच्या बीड जिल्ह्यातील सहाही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा. उद्योग पळविणाऱ्या, महागाई-बेरोजगारी वाढविणाऱ्या, जातीय विष पेरणाऱ्या महायुतीला हद्दपार करा असे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विविध विभागातील पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, राज्यातील विद्यमान खोके सरकारने भाजपकडून पेटी पॅक खोके घेऊन शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडत राज्यात सत्तेत आले. सत्तेत येण्यासाठी घेतलेल्या खोक्यांमुळे सत्तेत आल्यानंतर महाराष्ट्रात येणारे अनेक उद्योग धंदे गुजरात कडे वळविले. महाराष्ट्रात नवीन उद्योग येऊ दिले नाही तसेच सुरू असलेले अनेक उद्योग बंद पाडायचे षडयंत्र खोके यंत्रणेमुळे पार पाडले. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. महाराष्ट्रातील बेरोजगारीचा टक्का प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला. येथील सुशिक्षित तरुण-तरुणींना उदर भरणासाठी आता शासकीय-प्रशासकीय नोकऱ्यांसह एमआयडीसी मध्ये सुद्धा नोकऱ्या मिळेनाश्या झाल्या आहेत. नोकऱ्या नाही म्हणून कर्ज घेऊन उद्योग धंदे करावे तर शासन-प्रशासन कर्ज सुद्धा देत नाहीये. एवढंच काय उच्च शिक्षण घेण्यासाठी सर्वसामान्य गोरगरिबांच्या मुलामुलींना शैक्षणिक कर्ज घेऊन शिकायचे म्हटले तर शैक्षणिक कर्ज सुद्धा मिळत नाहीये. यामुळे सुशिक्षित नवतरुण आणि नवतरुणींची एक मोठी बेरोजगार जमात राज्यात निर्माण झाली आहे.फया सर्व बाबी कमी होत्या की काय म्हणून महायुतीतील भाजप, शिंदे सेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांनी लहानांपासून वयोवृद्धांपर्यंतच्या मनात जातीय वादाची बीजे मोठ्या प्रमाणात पेरून ठेवली. जातीय वादाची सुरुवात मोठ्या प्रमाणात प्रथम २०१४ सालापासून भाजपने केंद्रातून केली होती. गेल्या १० वर्षात याची पाळेमुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात नियोजनबद्धरीत्या रुजवली गेली. आज कोणत्याच जातीचे महिला आणि पुरुष दुसऱ्या जातीच्या महिला व पुरुषांवर विश्वास ठेवत नाहीये. सर्वांच्या मनात एक प्रकारचा अविश्वास आणि भिती महायुतीतील या तिन्ही पक्षांनी मिळून निर्माण केले आहे. १० वर्षांपूर्वी संपूर्ण भारत देशात गुण्यागोविंदाने राहणारे, एक दुसऱ्याच्या सुखदुःखात धावून जाणारे, वेगवेगळ्या जाती धर्माचे नागरिक आज मात्र एक दुसऱ्याला पाण्यात पाहू लागले आहेत. एवढी भयान अवस्था महायुतीच्या सत्ताधाऱ्यांनी राज्यात करून ठेवली आहे.

ही सर्व परिस्थिती जर येणाऱ्या काळात सुद्धा अशीच राहिली तर पुरोगामी म्हटला जाणारा महाराष्ट्र बेरोजगार आणि जातीयवादी महाराष्ट्र म्हणून ओळखला जाईल. या अवस्थेपासून वाचविण्यासाठी महायुतीतील तिन्ही पक्षांना यावेळी विधानसभा निवडणुकीत हद्दपार करून महाविकास आघाडीतील राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या तिन्ही पक्षांचे उमेदवार निवडणुकीत जिथे-जिथे उभे आहेत तिथे-तिथे त्यांना भरघोस मतदान करून निवडून आणावे. बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे सर्व उमेदवारांना सुद्धा प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे गणेश जवकर प्रदेश सरचिटणीस रो.स्वयंम.वि.महाराष्ट्र राज्य काँग्रेस पार्टी, बीड जिल्हा काँग्रेस कमिटी निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग बीड जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन, निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग बीड जिल्हा उपाध्यक्ष शेख आमेर पाशा, ओ.बी.सी. सेलचे बीड शहराध्यक्ष सय्यद फरहान, निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग बीड तालुकाध्यक्ष शेख जहीर अमीर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# प्रभाग क्रमांक ८ व १७ मधून आमदार संदीप क्षीरसागर यांना लीड देणार - शेख ताहेर

## गेल्या निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांनी प्रथमच बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली

बीड (प्रतिनिधी) - आगामी विधानसभा निवडणुकीत येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी बीड शहरातील प्रभाग क्रमांक ८ व १७ मधून विद्यमान आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार संदीप क्षीरसागर यांना मोठ्या मतांची लीड देणार असे सामाजिक कार्यकर्ते शेख ताहेर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांनी प्रथमच बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. तत्पूर्वी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद चे सदस्य



व सभापती म्हणून त्यांना राजकारणासह समाजकारणाचा अनुभव बऱ्यापैकी होता. त्यानंतर बीड नगर परिषद साठी गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काकू-नाना आघाडी निर्माण करून लढविलेल्या निवडणुकीत त्यांनी २१ जागा जिंकून दिल्या होत्या. पहिल्याच प्रयत्नात २१ नगरसेवक निवडून आणणे, हे काही येऱ्या गबाळ्याचे काम नव्हे. यावरून त्यांची नेतृत्व क्षमता जनतेच्या लक्षात आलीच होती. पक्षश्रेष्ठींना सुद्धा त्यांच्या क्षमतेची चुणूक दिसली म्हणून गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विधानसभेचे तिकीट दिले होते आणि पहिल्याच प्रयत्नात आमदारकीची निवडणूक लढवून संदीप क्षीरसागर यांनी मैदान मारत निवडणूक जिंकली आणि आमदार होऊन विधानसभेत थाटात पोहोचले होते. गेली पाच वर्षे आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी सर्वसामान्य कार्यकर्त्यांसह निस्वार्थ भावनेने त्यांच्यासोबत असलेल्यांना यथायोग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हेच धोरण काही स्वार्थी लोकांना भावले नाही आणि ते आमदार संदीप क्षीरसागर यांना सोडून गेले. यावेळी ज्या अफवा उडविल्या जात आहेत, त्यात काहीही तथ्य नाही. कारण संदीप क्षीरसागरांची ही निवडणूक यंदा सर्वसामान्य कार्यकर्त्याने आपल्या अंगाखांद्यावर घेतली आहे. त्यांच्यासोबत कोणीच नाही म्हणणाऱ्यांना जेव्हा आमदार संदीप क्षीरसागर यांनी प्रचार सुरू केला तेव्हा त्यांच्यासोबत प्रत्येक परिसरात गेल्यानंतर कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य जनता जेव्हा शेकडो व हजारोंच्या संख्येने दिसू लागली तेव्हा टीका करणाऱ्यांचे दात घशात जाऊ लागले आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत स्थानिक पातळीवर मोठ मोठी नावे दिसत नसली तरी आमच्यासारखे सच्चे आणि पक्के कार्यकर्ते त्यांच्यासोबत आहेत. त्यांना आमच्या येथील प्रभाग क्रमांक ८ आणि १७ मधून त्यांना मोठे मताधिक्य मिळवून देणार असे सामाजिक कार्यकर्ते शेख ताहेर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ९ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# बीड मतदारसंघात फक्त डॉ ज्योती मेटे यांचाच बोलबाला

बीड (वार्ताहर) :- मतदारसंघात जस जशी निवडणूक मतदानाची तारीख जवळ येत आहे.तस-तशी अपक्ष उमेदवार डॉ ज्योती विनायक मेटे यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे. सध्या बीड मतदारसंघात फक्त ज्योती ताईंचाच बोलबाला दिसून येत आहे.


बीड मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने बीड तालुक्यातील पांगरबावडी , वायभटवाडी, मोचे पिंपळगाव, घोडका राजुरी, काठोडा, वांगी, इमामपुर , भावनवाडी, कुटेवाडी, बोरफडी, हिवरापहाडी, निर्मळवाडी, कारळवाडी, ढेकनमोह तांडा, घाटसावळी, पोखरी, मैदा , मण्यारवाडी , आंबेसावळी, काळेगाव , जुजगव्हण , नाळवंडी , मौज , बकरवाडी, जरुड, शिवणी या गावांना भेट



दिली. तसेच या प्रचारफेरी दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीत मला मतदानरूपी आशीर्वाद द्यावेत, अशी मतदार बंधू भगिनींना विनंती केली. लोकांशी असलेला सातत्यपूर्ण जनसंपर्क, संवाद आणि विकास कामांसाठी आणलेल्या भरघोस निधीमुळे, झालेल्या अनेक विकास कामांमुळे आणि महिलांसाठी राबविलेल्या योजनेच्या प्रभावी अंमल बजावणी मुळे व वयोवृद्धांसाठी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ज्योती ताई मेटे या जनतेच्या मनात आपुलकी, आपलेपणा निर्माण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. तसेच त्यांचा उच्च शिक्षण आणि सोज्वळ स्वभाव व जनतेचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर तात्काळ तोडगा काढून सांगितलेले काम मार्गी लावण्याच्या तत्परतेमुळे ज्योती ताई मेटे यांनी मतदानाआधीच इतर उमेदवारांना बीड मतदारसंघातून खुप मागे टाकले आहे. ज्योती ताईंना निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते देखील मोठ्या प्रमाणात त्यांच्या प्रचारासाठी कामाला लागले असल्याने बीड मतदारसंघात ज्योती ताई मेटे यांचाच बोलबाला निर्माण झाला असून त्यांचा विजय जवळपास निश्चित झाला आहे. अशी चर्चा मतदारसंघात सर्वत्र ऐकायला मिळत आहे. बीड मतदारसंघात जस - जशी निवडणूक मतदानाची तारीख जवळ येत आहे तस तशी ज्योती ताई यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे.

# आरे बापरे....सुगावच्या नव मतदाराचे नाव पुसच्या मतदार यादीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी आनेक नवतरुणानी विधानसभा निवडणूकीसाठी नवीण मतदार यादीत ऑनलाईन नोंदनी केली आहे.मात्र नवीण मतदार यादीत घोळात घोळ झाला आसुन सुगावच्या तरूणाचे नाव परगावच्या मतदार यादीत नाव आल्यामुळे स्वतःच्या गावत मतदान न करता परगावला जाऊन मतदार यादी प्रमाने मतदान करण्याची वेळ आल्यामुळे नवीण मतदार संभ्रमात आहेत.पहिल्यांदाच मतदार यादीत नाव आल्याचा आनंद तरुणांच्या चेहऱ्यावर पाहीला मिळत आसलातरी तो हक्क दुसऱ्याच्या गावात बजावता येणार आसल्याने कभी खुशी कभी गम अशी स्थिती निर्माण झाली आहे विधानसभा निवडणुकीची सध्या जोरात रणधुमाळी सुरु आहे. मतदानाचा हक्क मिळावा यासाठी नव तरुणांनी आपले नाव ऑनलाईन नोंदवले आहे. त्यामुळे आपल्याला मतदानाचा हाक्क पहिल्यांदा मिळणार आसल्याचा आनंद नवतरूणाच्या चेहऱ्यावर



दिसत आसला तरी मतदार यादीत घोळच घोळ झाल्याने तरुणांची भ्रमनिराशा झाली आहे.परळी मतदारसंघातील व अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथील तरुण साईश्वर दिलीप आरसुळ यांने ऑगस्ट महिण्या मतदानाचा हक्क मिळावा या साठीऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी केली आहे. विधानसभा निवडणूकीसाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी साईश्वरने ऑनलाईन मतदान यादी पाहिली आसता त्याचे नाव परळी मतदारसंघातील पुस या गावातील मतदान यादीत नाव आल्याचे निदर्शनात आले आहे. त्यात मतदार ओळखपत्र क्र. विधानसभा मतदारसंघ क्रमांक २२३,भाग क्रमांक २४६पुस,मतदान केंद्राचा पत्ता हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुस आसा उल्लेख आला आहे. परळी मतदारसंघात सुगाव व पुस येत आसले तरी सुगाव ते पुस हा२० कि.मी आंतर पार करुण परगावच्या मतदार यादीत नाव आल्यामुळे स्वतःच्या गावत मतदान न करता परगावला जाऊन मतदार यादी प्रमाने मतदान करण्याची वेळ तरुणावर आली आहे. नवीण मतदार यादीत घोळात घोळ झाल्याने नवीण मतदार संभ्रमात आहेत.पहिल्यांदाच मतदार यादीत नाव आल्याचा व मतदान करण्याचा हक्क मिळाल्याचा आनंद तरुणांच्या चेहऱ्यावर पाहीला मिळत आसलातरी तो हक्क दुसऱ्याच्या गावात बजावता येणार आसल्याने कभी खुशी कभी गम अशी स्थिती तरुणाची झाली आहे

## वकास काय असतो हे करून दाखवतो - अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी लोकप्रतिनिधी हा सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणारा असावा तो फक्त आजारपणाचे कारण सांगून घरात बसणारा नसावा. सत्ता असूनही ज्यांना आपल्या भागाचा विकास करता येत नाही त्यांना लोकप्रतिनिधी म्हणावे कसे ? विरोधकांनी मिळालेल्या सत्तेचा वापर फक्त स्वार्थ साधण्यासाठी केला, विकासाचे आणि त्यांचे सोयरसुतक नव्हते अशी सडकून टिका करत मला जर सत्ता मिळाली तर विकास काय असतो हे मी करून दाखवतो फक्त एकवेळ महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना विजयी करून विकासपर्वाला प्रारंभ करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी केले. महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील राक्षसभुवन, गुळज, पाथरवाला, कुरणपिंप्री, बोरगाव आदी गावांना भेटी देवून मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि तालुक्यामध्ये रखडलेल्या विकास योजना गतीमान करण्यासाठी सत्ता हवी आहे. सत्ता नसतानाही मी जलसिंचनावर मोठे काम केले, तालुका पाणीदार व्हावा ही आपली प्रामाणिक भुमिका आहे, येणाऱ्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कायम प्रयत्नशील राहिल. केवळ निवडणुकीपुरते आपण भाषणे ठोकत नसून यापूर्वीही लोकांच्या कामात होतो आणि यानंतरही कामात राहील याची मी ग्वाही देतो. गेवराई विधानसभा मतदार संघात पुन्हा विकासाच्या कक्षेत आणण्यासाठी महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना प्रचंड मतांनी विजयी करा असेही ते यावेळी म्हणाले

# क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला; शहर-ग्रामीण भागातील मतदार अनिलदादांच्या पाठीशी- प्रा. सुरेश नवले



## बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा सधी द्या- अनिलदादा जगताप

काल रोजी माजी राज्य मंत्री प्रा सुरेश नवले यांच्यासह बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर बैठका घेऊन ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. यादरम्यान अनिलदादांनी मतदारांना बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा संधी द्या. मी आपल्या अपेक्षेप्रमाणे बीडकरांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून बीडच्या विकासाचा कायापालाट करून दाखवेल फक्त मतदानरुपी मला एकदा आशीर्वाद द्या अशी विनंती करत अहवान केले.

बीड, प्रतिनिधी– गेली अनेक वर्ष सत्ता भोगून क्षीरसागरांना केवळ बीडकरांच्या विश्वासाचा घात करत स्वतःचे घरं भरण्याचे काम केले आहे आणि बीडकरांना विकास तर सोडाच पण मूलभूत गरजांपासून वंचित ठेवण्याचे म हापाप केले आहे. सत्तेचा ताम्रपट घेऊन क्षीरसागरांच्या पिढ्यानुपिढ्या बीडवर आपली मक्तेदारी चालवत आल्या आहेत व बीड विकासाचा खेळखंडोबा करत आहेत. मात्र क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला असून सामान्य घरातील बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या पाठीशी शहर–ग्रामीण भागातील मतदार मोठ्या ताकदीने उभा राहिला असल्याचे माहिती माजी राज्यमंत्री प्रा. सुरेश नवले यांनी दिली आहे. काल दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळपासून बीड विधानसभेचे उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील चौसाळा जिल्हा परिषद गट पिंजून काढला असून वानगाव, गोगलवाडी, रौळसगाव, खडकी घाट, चांदेगाव, देवीबाभळगाव, जेबापिंप्री, पालसिंगण, हिंगणी खु., हिंगणी बु., रूईगव्हाण / माळेवाडी, मानेवाडी, पिंपळगाव घाट, वाढवणा, चौसाळा या सर्व गावात जाऊन कॉर्नर बैठका घेत ग्राम स्थांच्या गाठीभेटी घेतल्या. तसेच त्यांच्याशी मुक्त संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांना अनुक्रमांक १३ चिन्ह शिवण यंत्र यावर बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. दरम्यान शहर आणि ग्राम ीण भागातील मतदारांनी सुद्धा यंदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना निवडून देण्याचा निर्धार केला आहे. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वच गावात ठीकठिकाणी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेश नवले यांचा हृदय सत्कार करून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

-----

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com